विकास योजना सांगली [वाढीव क्षेत्र]
<u>जिल्हा :- सांगली</u>
सांगली नगरपरिषदेच्या वाढीव हद्दीतील
क्षेत्राच्या विकास योजनेस मंजूरी देणे.

महाराष्ट्र शासन,
नगर विकास विभाग,
शासन निर्णय क्र.टीपीएस-२०८२/५१६७/सीआर१६/८३/नवि-७
मंत्रालय, मुंबई-४०००३२. दिनांक २६ ऑगस्ट १९८८.

पहा :- १] संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र.डी/एसएनजी [ॲडीशनल-एरिया]/६१-८१/टीपीव्ही-२, दि.२७.११.८२ चे पत्र.

**शासन निर्णय :-** सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ श्री.भि.भागरे ]
कक्ष अधिकारी.

प्रति,
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे [अधिप्रमाणित केलेल्या भाग नकाशाच्या प्रतीसह].
जिल्हाधिकारी, सांगली.
उपसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
सहाय्यक संचालक, नगर रचना, सांगली.
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
मुख्याधिकारी, सांगली नगरपरिषद, सांगली, जिल्हा सांगली.
व्यवस्थापक, येरवडा कारागृह, पुणे.

[त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सोबत पाठविलेली शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राच्या भाग १ पुणे विभाग पुरवणी मध्ये प्रसिद्ध करुन त्याच्या प्रत्येकी १० प्रती ह्या विभागास व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे व सहाय्यक संचालक, नगर रचना, सांगली यांना पाठवाव्यात.]

नगर रचना आणि मूल्य निर्धारण विभाग
आवक क्रमांक ३४५८
दिनांक :- २३।८।८८
दप्तर क्रमांक

१०५०

# अधिसूचना

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२. दिनांक १६ ऑगस्ट १९८८.

क्रमांक: टीपीएस-२०८२/५१६७/सीआर १६/८३/नवि-७.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६

ज्याअर्थी, सांगली नगरपरिषदेने [यापुढे "उक्त नगर परिषद" म्हणून उल्लेखिलेली] महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम-१९६६ [येथून पुढे "उक्त अधिनियम" म्हणून निर्दिष्ट] चे कलम-३४ व कलम-२३ उपकलम [१] खाली त्यांच्या वाढीव हद्दीतील क्षेत्रासाठी विकास योजना करण्याचा इरादा त्यांच्या ठराव क्रमांक-३४८[ब] दिनांक ११ जानेवारी १९७९ च्या घोषणेद्वारे जाहीर केला आणि संबंधीत घोषणा दि.८.३.७९ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र पुरवणी भाग-१७, पुणे विभागाच्या पृष्ठ क्रमांक-६३७ वर प्रसिध्द केली,

आणि ज्याअर्थी, उक्त नगरपरिषदेने आवश्यक सर्वेक्षणानंतर प्रारुप विकास योजना तयार करुन ती दि.२८ फेब्रुवारी १९८० रोजी प्रसिध्द केली, आणि त्यासंबंधीची नोटीस उक्त अधिनियमाच्या कलम २६[१] अन्वये दि.१० एप्रिल १९८० च्या महाराष्ट्र शासन राजपत्र पुरवणी, भाग १७, पुणे विभागाच्या पृष्ठ क्रमांक-११०५ व ११०६ वर लोकांच्या हरकती व सूचना मागविण्यासाठी प्रकाशीत केली,

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम -२८च्या उपबंधानुसार विकास योजनेवर लोकांकडून आलेल्या हरकती व सूचना विचारांत घेऊन उक्त नगर परिषदेने महाराष्ट्र शासनाकडे उक्त विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३०[१] अन्वये दि.२७ मार्च १९८१ रोजी मंजूरीसाठी सादर केली;

आणि ज्याअर्थी, नगर विकास विभाग, शासन अधिसूचना क्र.टीपीएस/२०८२/५१६७/सीआर १६/८३/ नवि-७, दिनांक २९.७.८८ अन्वये महाराष्ट्र शासनाने विकास योजनेस मंजूरी देण्यासाठी वा मंजूरी नाकारण्यासाठी असलेली मुदत दि.१५ ऑक्टोबर.८८ पर्यंत तो दिवस धरुन वाढविली,

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने किरकोळ फेरबदलासह सदर विकास योजनेला मंजूरी देण्याचे ठरविले.

म्हणून आता सदर अधिनियमाच्या कलम-३१ उपकलम [१] खाली दिलेले अधिकार व त्या अनुषंगाने असलेल्या इतर अधिकारांनुसार व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेशी विचार विनिमय करुन या द्वारे महाराष्ट्र शासन

अ] सदर विकास योजनेला गौण स्वरुपाच्या फेरबदलासह [सोबतच्या अनुसूचित नमूद केल्याप्रमाणे] मंजूरी देत आहे.

ब] मंजूरी दिल्याप्रमाणे सदर विकास योजना अंमलात येण्यासाठी दिनांक ~~१५ ऑक्टोबर~~ ८८ निश्चित करीत आहे.
१६ ऑक्टोबर

## फेरबदलाची अनुसूची

च्या उत्तरेकडील भाग
१] माध्यमिक शाळेसाठी आरक्षित असलेल्या आ.५.अ-१, नारिंगी रंगाने
[भूमि अभिन्यासातील खुली जागा] विकास योजना नकाशावर अशा त-हेने आरक्षण
दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येईल.
खालील क्षेत्र अंदाजे ७३७५ चौ.मी. इतके असेल.

२] सांगली नगरपरिषदेच्या मालकीची रि.स.नं.५४१/२ ही सांगली शहराच्या "सार्वजनिक उपयोगासाठी"
वाढीव हद्दीच्या प्रारूप विकास योजनेमध्ये अस्तित्वातील नारिंगी रंगाने दर्शविल्याप्रमाणे
दाखविलेली जमीन आता विकास योजना नकाशावर सदरहू
"ऑल इंडीया रेडीओ स्टेशन सांगली" करीता आरक्षित करण्यात येईल. डायरेक्टर जनरल, ऑल
आरक्षणाच्या भू-संपादनासाठी समुचित प्राधिकरण म्हणून संबोधण्यात येईल. सदरहू
इंडीया रेडीयो [भारत सरकार] नवी दिल्ली यांना
आरक्षणास अ-१७ नवीन आ.क्र. देण्यात येत आहे.

३] विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाने दर्शविल्याप्रमाणे स.नं.२७६
[सांगलवाडी] चा सार्वजनिक व निम-सार्वजनिक वापरासाठी दर्शविलेला आयताकृती
भाग आता रहिवास विभागात समाविष्ट करण्यात येत आहे.

४] अस्तित्वातील भूवापर नकाशावर तसेच नियोजित भूवापर नकाशावर
स.नं.५४२ हा नजरचुकीने व्यापारी विभागात [पेट्रोल पंप] दाखविलेला वापर आता
विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाने दर्शविल्याप्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

४अ] रि.स.नं. ५४२ मधील अंदाजे ९३२.२८चौ.मि.[१००३५ चौ.फूट]इतके क्षेत्र
शेती विभागातून वगळून व्यापार विभागात समाविष्ट करण्यात येत आहे. सदरहू
बदल विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाने दर्शविला आहे.

५] मूळ हद्दीतील सुधारीत विकास योजनेस लागू असलेले व केलेली सुधारीत
करण्यात आलेले विकास नियंत्रण नियम वाढीव हद्दीतील क्षेत्रासाठी सुद्धा लागू होतील.

६] जिल्हाधिकारी, सांगली यांच्या दि.६.८.१९७७च्या आदेशानुसार
ऑफिसर्स कॉलनी पॉन्ड भोवती सोडावयाच्या खुल्या जागेबाबतची बंधने[नियम]
यापुढेही कायम रहातील.

७] रि.स.नं.५३४ मधील अंदाजे ०-८० हे.इतकी जमीन "ऑल इंडीया रेडीओ
स्टाफ क्वार्टर्स"साठी आरक्षित करण्यात येईल. सदरहू आरक्षणासाठी समुचित प्राधिकरण
म्हणून डायरेक्टर जनरल, ऑल इंडीया रेडीओ, नवी दिल्ली यांना संबोधण्यात
येईल व त्यास अ-१८हा नवीन आरक्षण क्रमांक देण्यात येत आहे.

८] शासनास मंजुरीसाठी सादर केलेल्या विकास योजनेतील स.नं.४८९-ब
[भाग] पैकी अस्तित्वातील शेती उद्देशासाठी म्हणून दाखविलेले अंदाजे ०.४
हे.इतके क्षेत्र आता विकास योजना नकाशावर नारिंगी रंगाने दर्शविल्या प्रमाणे
दूरदर्शन केंद्रासाठी आरक्षित करण्यात येईल व त्यास अ-१९ हा नवीन आरक्षण
क्रमांक देण्यात येईल.

९] स.नं.४४०[भाग] व ४४१[भाग] या मंजूर अभिन्यासातील प्लॉट क्रमांक ८, ९ व १० चा जमीन वापर शेती विभागाऐवजी विकास योजना नकाशावर नारंगी रंगाने दर्शविल्याप्रमाणे रहिवास विभागासाठी करणेत येईल.

१०] विकास योजनेच्या नकाशावर नारंगी रंगाने दर्शविल्याप्रमाणे रि.स.नं.५४६[भाग], ५५५[भाग], ५६०[भाग] आणि ५५८[भाग] चा भूवापर आता "शेती" विभागा ऐवजी "रहिवास विभाग" असा करणेत येईल.

NOTIFICATION

Urban Development Department,
Mantralaya, Bombay 400 032.

Dated the 16th August 1988

Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

No.TPS 2082/5167/CR 16/83/UD-7: Whereas the Sangli Municipal Council ( hereinafter referred to as "the said Municipal Council" ) by its resolution No.348(5) dated the 11th January, 1979 made a declaration under section 34 read with section 23(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") of its intension to prepare a draft Development Plan for the area within its extended Municipal limits and the said declaration was published in Maharashtra Government Gazette, Part-I Pune Division suppliment dated the 8th March 1979 at page No.637;

And whereas, the said Municipal Council after carrying out the necessary surveys of the said area prepared and published a draft Development Plan (hereinafter referred to as "the said Development Plan") on 28th February 1980 and published a notice to that effec in Maharashtra Government Gazette, Part-I, Pune Division suppliment dated the 10th April 1980 at pages 1105 and 1106 inviting suggestions and objections thereby to the said Development Plan in accordance with the provisions of sub-section (1) of section 26 of the Act.

And whereas, the said Municipal Council after considering the suggestions and objections received by it from the public in accordance with the provisions of section 28 of the said Act, and has submitted the said Development Plan as modified by it to Government

-2

of Maharashtra for sanction under sub-section(1) of section 30 of the said Act, on 27th March 1981;

And whereas, in accordance with the provisions of sub-section (1) of section 31 of the said Act, it was necessary for Government to sanction the said Development Plan or refuse to give sanction thereto on or before 30-3-87.

And whereas it is expedient to extend the period for sanctioning of the said Development Plan by a period upto and inclusive of 29-7-88,

And whereas, the Government of Maharashtra proposed to sanction the said Development Plan with modifications which are of minor nature as specified in the schedule of modification appended hereto;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section(1) of section 31 of the said Act, and all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra after consulting the Director of Town Planning, hereby :-

a) Sanction the said Development Plan with certain modifications which are of minor nature as specified in the schedule appended here to and

b) Fixes 16th October 88, to be the date on which the final Development Plan as sanctioned shall come into force.

NOTE :- The aforesaid Development Plan as sanctioned by the State Government shall be forwarded to the Sangli Municipal Council and shall be kept open for a period of one year for inspection by the public during working hours in the office of the Sangli Municipal Council on all working days.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S.U. Bhagore
Desk Officer

## SCHEDULE OF MODIFICATIONS

1) Notch on the northern side of site No.A-1 reserved for High School shall be deleted and included in residential zone (layout open space ) as shown in orange on the Development Plan site shall admeasure about 7375 sq.m.

2) The municipal land in R.S.No.541/3 of Sangli shown as existing public utility in the Draft Development Plan of Additional Area of Sangli submitted to Government for sanction shall be reserved as "All India Radio Station Sangli" as shown in orange on the Development Plan. Site shall be numbered as A.17. The appropriate Authority for acquisition of this site shall be Director General. All India Radio (Government of India), New Delhi.

3) A small rectangular portion out of S.No.276 of Sangalwadi shown under Public and Semi-Public use, shall be included in residential zone as shown in orange on the Development Plan.

4) Portion of S.No.542 of Sangli has been shown incorrectly both in respect of location and extent as on existing commercial area (Potrol Pump)on the Existing Land use map and Proposed Land use map. The proposed Land use map shall be corrected suitably as shown in orange on the Development Plan.

4-A) Land admeasuring about 10035 sq.ft (223' x 45') (932.28 sq.m.) from R.S.No.542 of Sangli shall be excluded from 'Agricultural Zone' and included in 'Commercial Zone' as shown in orange on the Development Plan.

5) The Development Control Rules applicable to the Revised Development Plan of Sangli for the Original Municipal limits

as may be amended from time to time shall be applicable to the area within the extended municipal limits.

6) Restrictions of leaving certain open belt around the site of oxidation pond in the additional area of Sangli as per Collector of Sangli's Order dated 6-8-1976, shall be followed by the Sangli Municipal Council.

7) Land admeasuring 0.80 hectare from R.S.No.534 of Sangli shall be reserved for "All India Radio Staff Quarters Sangli" as shown in orange on the Development Plan. The site shall be numbered as A-18. The appropriate authority for acquisition of this site shall be Director General, All India Radio (Government of India), New Delhi.

8) Land bearing S.No.489-D(part) admeasuring one acre (about 0.4 H.) and shown as existing compost pits on the Development Plan submitted by the Municipal Council shall be reserved for T.V.Transmission Centre(site No.A-19) as shown in orange on the Development Plan.

9) Zoning of Plot Nos. 8,9,10 from the approved layout of S.No.440 pt. and 441 pt. shall be changed from Agricultural to Residential as shown in orange on the Development Plan.

10) Zoning of lands bearing R.S.No.546 pt, 555 pt, 556 pt. 560 pt, and 558 pt shall be changed from Agricultural to Residential as shown in Orange on the Development Plan.

...........